# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड औरंगाबाद- 431005

## परिपत्रक

विषय : **महामंडळ अखत्यारितील न्यायालयीन प्रकरण चालविण्यासाठी वकीलांना द्यावयाच्या विधीशुल्काबाबत.**

संदर्भ : **महामंडळाचे परिपत्रक क्र. जा. क्र. परिपत्रक/न्यायप्र/विधीशुल्क/2014/1183/9509, दिनांक 15.11.2014**

**प्रस्तावना :**

महामंडळ अखत्यारीतील कोर्ट प्रकरणे चालविण्यासाठी वकीलांना द्यावयाचे विधीशुल्काचे दरपत्रक संदर्भाधीन परिपत्रकान्वये अटी व शर्तीच्या अधीन राहून लागू करण्यात आले होते. सदर परिपत्रकानुसारचे विधी शुल्क सन 2014 मध्ये निर्धारित करण्यात आले होते. सद्य:स्थितीत यात सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याने महामंडळाचे कायदा सल्लागार यांनी प्रस्तावित केल्यानुसार व नियामक मंडळाच्या मान्यतेनुसार (64 व्या बैठकीतील ठराव क्र. 64/5) आता या परिपत्रकाद्वारे या पूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करून हे परिपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांका नंतरच्या प्रकरणांसाठी खालील प्रमाणे सुधारीत विधीशुल्क वकिलांना प्रदान करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

### महामंडळाचे वतीने नेमण्यात येणाऱ्या वकीलासाठी सुधारीत विधीशुल्काचे दरपत्रक, अटी व शर्ती

| अ.क्र | न्यायालयीन प्रकरणाचे स्वरूप | सुधारीत विधीशुल्क |
|---|---|---|
| 1 | अ) **कामगार न्यायालयात** प्रत्येक केस करिता | रु.3,000/- |
| | ब) तीन पेक्षा जास्त केसेस एकत्र चालणार असतील तर त्याची एकत्रित फीस | रु.10,000/- |
| 2 | अ) **औद्योगिक न्यायालयात** केस असेल तर प्रत्येक केस मागे संपूर्ण फीस | रु.5,000/- |
| | **ब)** तीन पेक्षा जास्त केसेस एकत्र चालणार असतील तर त्याची एकत्रित फीस | रु.10,000/- |
| 3 | **दिवाणी न्यायालयीन प्रकरणे** | |
| | **अ) लवाद व्यतिरिक्त दिवाणी न्यायालयीन प्रकरणे** | |
| | **1. रु. 3.00 लक्ष पर्यंत** | रु.5,000/- |
| | **2. रु. 3.00 लक्ष ते 1 कोटी पर्यंतची प्रकरणी संपूर्ण फीस** | रु.15,000/- |
| | **3. रु. 1 कोटी ते रु. 3 कोटी पर्यंतची प्रकरणी संपूर्ण फीस** | रु.22,500/- |
| | **4. रु. 3 कोटी पेक्षा जास्त रक्कमेची प्रकरणे** | रु.35,000/- |
| | **ब) जिल्हास्तरीय न्यायालयातील भूसंपादन प्रकरणे** | |
| | **1. भूसंपादन प्रकरणात (L.A.R)** प्रत्येक प्रकरणी | **रु.3,000/- नंतरच्या प्रत्येक प्रकरणासाठी रु.1,000/- जास्तीत जास्त रु.12,000/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | 2. दरखास्त | रु.1,000/- प्रती प्रकरण | |
| | एका वेळी तीन पेक्षा जास्त प्रकरणे चालणार असतील तर | Nil | |
| 4 | **अ) ग्राहकमंच प्रत्येक केस करिता (3 केस पर्यंत)** | रु.2,500/- | |
| | **ब)** तीन पेक्षा जास्त केसेस एकत्रित चालणार असतील तर त्याची एकत्रित फीस | रु.8,000/- | |
| 5 | **लवादकासमोर चालणाऱ्या लवाद प्रकरणाचे शुल्क** | **रु.3 कोटी पर्यंत रु.50,000/- त्यानंतर रु.70,000/-** | |
| 6 | **दिवाणी अचार संहिता (C.P.C) व इतर कायद्याखाली नोटीस ला उत्तर देणे** | रु.1,000/- खर्चासह | |
| 7 | **उच्च न्यायाल व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT)** | **औरंगाबाद खंडपीठ** | **मुंबई उच्च न्या. व नागपूर खंडपीठ** |
| | 1) **महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरणात (MAT)** एकत्रित चालणाऱ्या प्रकरणांसाठी पहिल्या प्रकरणात | रु.8,500/- | रु.10,000/- |
| | व त्यापुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.2,500/- | रु. 2,500/- |
| | **2) उच्च न्यायालयातील प्रकरणे व भूसंपादन प्रकरणात (L.A.R) अपील करणे** | | |
| | **अ)** महामंडळातर्फे भूसंपादन प्रकरणात (L.A.R) अपील दाखल करणे | रु. 15,000/- | रु. 20,000/- |
| | पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु. 3,000/- | रु. 3,000/- |
| | **ब)** एल.ए.आर. (प्रथम अपील प्रकरणात) महामंडळ प्रतिवादी असल्यावर पहिल्या प्रकरणात | रु.12,000/- | रु.15,000/- |
| | व त्यापुढील प्रत्येक प्रकरणात | रु. 2,000/- | रु. 2,000/- |
| | **क)** कर्मचाऱ्यासाठी उच्च न्यायालयातील एकत्रित प्रकरणासाठी महामंडळातर्फे अपील करण्याचे असल्यास प्रथम प्रकरणात | रु. 15,000/- | रु. 20,000/- |
| | व त्यापुढील प्रत्येक प्रकरणी | रु. 3,000/-. | रु. 3,000/-. |
| | ड) कर्मचाऱ्याच्या उच्च न्यायालयातील एकत्रित प्रकरणासाठी महामंडळ प्रतिवादी असल्यास प्रथम प्रकरणात | रु. 12,000/- | रु. 15,000/- |
| | व त्यापुढील प्रत्येक प्रकरणात | रु. 2,000/- | रु. 2,000/- |
| | **3) महामंडळाचे पूर्व मान्यतेने खालील प्रमाणे कार्यवाही करता येईल** | अ) जर उच्च न्यायालयाच्या प्रकरणात सिनिअर कॉन्सील देणे योग्य वाटत असल्यास सिनिअर कॉन्सीलची फी, कायदा सल्लागार यांच्या सल्ल्या नुसार कार्यकारी संचालक अंतीम करतील. | |
| | **अ)** जर उच्च न्यायालयाच्या प्रकरणात सिनिअर कॉन्सील देणे योग्य वाटत असल्यास सिनिअर कॉन्सीलची फी, ज्युनिअर कॉन्सीलना ठरविलेल्या फी पेक्षा दुप्पट व 2.5 पट ठरविण्यात येत आहे. | | |
| | **ब)** अगदी खुप मोठा वकील नेमण्याचे ठरले तर त्याची विशेष फी महत्व बघून महामंडळ ठरवेल. | ब) अगदी खुप मोठा वकील नेमण्याचे ठरले तर त्याची विशेष फी महत्व बघून महामंडळ ठरवेल. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4) **रिट याचिका** | **औरंगाबाद खंडपीठ** | **मुंबई उच्च न्या. व नागपूर खंडपीठ** |
| | **अ)** महामंडळ याचिकाकार असतांना प्रथम प्रकरणात | रु.15,000/- | रु.20,000/- |
| | (Group matter) मध्ये पुढील प्रत्येक प्रकरणासाठी | रु.3,000/- | रु.3,000/- |
| | **ब)** रिट याचिकेत महामंडळ प्रतिवादी असल्यावर पहिल्या प्रकरणात | रु.12,000/- | रु.15,000/- |
| | व त्यापुढील प्रत्येक प्रकरणात | रु.2,000/- | रु.2,000/- |
| | 5) **जनहित याचिका** | | |
| | प्रतिवादी तर्फे | रु.25,000/- | रु.30,000/- |
| | खर्च (Expenses) | रु.1,500/- | रु.1,500/- |
| | 6) **अवमान याचिका** | रु.7,000/- | |
| | प्रतिवादी तर्फे खर्च (Expenses) | रु.1,500/- | |
| | 7) **कॅव्हेट** | | |
| | मा. प्रशासकीय न्यायाधिकरण व मा. उच्च न्यायालय | रु.1,000/- | |
| | वादी तर्फे | रु.500/- | |
| | खर्च (Expenses)<br>भत्ता<br>पोस्टेज नियमाप्रमाणे वकीलांना देणे<br>कॅव्हेटची प्रत स्पीडपोस्टने प्रतिवादींना पाठवणे तो खर्च वकीलांना देणे | **प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे भत्ता, पोस्टेज नियमाप्रमाणे वकीलांना देणे, कॅव्हेटची प्रत स्पीडपोस्टने प्रतिवादींना पाठवणे तो खर्च वकीलांना देणे** | |
| | 8) **इंटरव्हेनर** | | |
| | अ) अर्ज मान्य होईपर्यंत | रु.3000/- | |
| | खर्च (Expenses) | रु.1000/- | |
| | ब) अर्ज मान्य होऊन अपीलकार, सहअपीलकार/ प्रतिवादी झाल्यावर | **प्रथम अपीलात देय असल्यानुसार** | |
| 8 | **फौजदारी प्रकरणे (ज्यामध्ये सरकारी कामकाजाशी संबंधीत आरोप असतील त्यात)** | | |
| | **1) न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयातील प्रकरणे** | **(सर्व आरोपीसाठी एकत्रीत)** | |
| | **अ)** पोलिस कस्टडी बाबत व जामिन अर्जासाठी | रु.5,000/- | |
| | **ब)** प्रकरण चालविण्यासाठी | रु.10,000/- | |
| | खर्च (Expenses) | रु.500/- | |
| | 2) **सत्र न्यायालयात** | | |
| | **अ)** पोलिस कस्टडी बाबत व जामिन अर्जासाठी | रु.10,000/- | |
| | **ब)** प्रकरण चालविण्यासाठी | रु.30,000/- | |
| | खर्च (Expenses) | रु.1,000/- | |

| | | |
|---|---|---|
| 9 | **विधीज्ञ शुल्क देण्याचे टप्पे** | |
| | प्रथम अपील दाखल करतांना Court fee+खर्च+विधीज्ञ शुल्क | 50% |
| | प्रकरण दाखल झाल्यावर | |
| | अंतीम निकालानंतर निकालाच्या प्रती, डिक्री व मुळ धारिका परत केल्यावर | 50% |
| 10 | **प्रतिवादी असतांना** | |
| | अ) वकील पत्र दाखल करतांना | 50% |
| | ब) अंतीम निकालानंतर निकालाच्या प्रती, डिक्री व मुळ धारिका परत केल्यावर. | 50% |
| 11 | **मा. सर्वोच्च न्यायालय** | |
| | **अपीलकार असतांना ग्रुप मॅटर मधील प्रत्येक प्रकरणात -** | |
| | **अ)** प्रथम प्रकरण- | **रु.60,000/- प्रकरण निकाली निघेपर्यंत खर्चासह पुढील प्रत्येक प्रकरणी रु.10,000/-** |
| | **ब)** जेष्ठ विधीज्ञ – | **रु.1,50,000/- प्रति प्रत्यक्ष सुनावणी** |
| | प्रतिवादी असतांना ग्रुप मॅटर मधील प्रत्येक | |
| | **अ)** प्रकरणात - | **रु.50,000/- प्रकरण निकाली निघेपर्यंत पुढील प्रत्येक प्रकरणी रु.10,000/-** |
| | **ब)** जेष्ठ विधीज्ञ - | **रु.1,00,000/- प्रति प्रत्यक्ष सुनावणी** |
| 12 | विधीज्ञ शुल्क देण्याचे टप्पे | |
| | अ) प्रथम अपील /SLP दाखल करतांना Court fee+खर्च+विधीज्ञ शुल्क | 50% |
| | प्रकरण दाखल झाल्यावर/शपथपत्र दाखल केल्यानंतर | |
| | अंतीम निकालानंतर निकालाच्या प्रती, डिक्री व मुळ धारिका परत केल्यावर | 50% |
| | ब) प्रतिवादी असतांना | |
| | वकील पत्र दाखल करतांना | 50% |
| | अंतीम निकालानंतर निकालाच्या प्रती, डिक्री व मुळ धारिका परत केल्यावर | 50% |
| 13 | **विविध न्यायालयात प्रकरण चालवितांना देय असलेला खर्च (प्रती प्रकरण)** | |
| | 1) दिवाणी दावा व लवाद व्यतीरिक्त | **रु.1,500/- प्रती प्रकरण** |
| | 2) कामगार व औद्योगिक न्यायालय, ग्राहक मंच | रु.1,000/- |
| | 3) भूसंपादन संदर्भ ( एल.ए.आर.) | रु.1,500/- |
| | वरीष्ठ न्यायालयाचे निकालाचे दाखले प्रथम अपिलात प्रतीवादी असतांना प्रत्यक्ष झालेला खर्च देण्यात येईल. | **प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे** |

| | |
|---|---|
| 4) महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण | रु.1,500/- |
| 5) उच्च न्यायालय<br>वरीष्ठ न्यायालयाचे निकालाचे दाखले<br>प्रथम अपिलात प्रतीवादी असतांना प्रत्यक्ष झालेला खर्च देण्यात येईल | रु.4,500/-<br>**प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे** |
| 6) लोकन्यायालय/न्यायालयात तडजोड झाल्यास | **देय असलेल्या उर्वरित (50%) विधीज्ञ शुल्काचे 50% शुल्क अदा करण्यात येईल तडजोडीचे वेळी संबंधीत विधीज्ञाने हजर राहून तडजोड पत्रावर स्वाक्षरी करणे** |
| **वरील प्रकरणांव्यतिरीक्त उदभवणा-या प्रकरणांतील विधिज्ञ शुल्क ठरविण्याचा अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना असेल.** | |

**नोट - वरिल विधीज्ञ शुल्क व खर्च हे त्या प्रकरणात दाखल केल्या जाणा-या अर्जासह निश्चित केले आहेत. त्यामुळे प्रकरंणातील अंतरीम अर्जासाठी वेगळा खर्च वा विधीज्ञ शुल्क देय असणार नाही.**

**वकीलांना द्यावयाच्या विधीशुल्काबाबत अटी व शर्ती : -**

1. महामंडळाने ठरवून दिलेल्या शुल्कामध्ये प्रकरणासाठी लागणाऱ्या संपूर्ण कालावधीत काम करावे लागेल.
2. वकीलाने शासन/महामंडळाचे हित जोपासण्यासाठी जाणीवपुर्वक व सप्रमाण (with Evidence) युक्तीवाद मा. न्यायालयासामोर करणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व आवश्यक कागदपत्रे, पुरावे, कायद्यातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल इत्यादी सर्वाचा अभ्यास करून न्यायालयासमोर मांडणी करावी व शासनाच्या बाजुने निकाल लावण्यासाठी प्रयत्नशील रहावे.
3. महामंडळाच्या अहिताची कामे केल्यास नियुक्ती रद्द केली जाईल.
4. न्यायालयीन प्रकरणासाठी प्रवास खर्च वकीलाने स्वत: करावयाचा आहे. प्रवास भत्ता देणे महामंडळास बंधनकारक राहणार नाही.
5. नेमून दिलेल्या जिल्ह्यातील महामंडळ अधीकाऱ्यानी दिलेली प्रकरणे हाताळावी लागतील.
6. मा. सर्वोच्च न्यायालयात / उच्च न्यायालय प्रकरणातील विलंब क्षमापीत करणे ( Delay Condonation) या कारणामुळे अथवा इतर कोणत्याही कारणाने प्रकरण दाखल करतांना (Admission Stage) ते प्रकरण निकाली निघाले/ खारीज (Dismiss) झाले तर पॅनलवरील वकीलांना एकूण विधीशुल्कापैकी प्रकरण न्यायालयात दाखल करतांना प्रथम टप्प्यात अदा केलेल्या शुल्काव्यतीरिक्त उर्वरित फी देण्यात येणार नाही.
7. अटी शिथील करण्याचा किंवा नविन अटी करण्याचा अधिकार महामंडळास राहील.
8. अवश्यकता भासल्यास संबंधीत जिल्ह्यातील अधिकारी वकीलाशी संपर्क साधतील तेंव्हा त्यांना कायदेशीर सल्ला द्यावा लागेल.
9. कैफीयत न्यायालयात वेळेवर सादर होईल हे पाहण्याची जबाबदारी वकीलाची राहील. प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर राहुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधीत अधिकाऱ्यांना व त्यांच्या कार्यालयाला आवश्यक माहिती बाबत पत्राद्वारे कळवावा लागेल.
10. वकीलपत्र देण्यापूर्वी संबंधीत वकीलांना वरील दराने व नमूद केलेल्या टप्प्या प्रमाणे शुल्क अदा केले जाईल या बाबत अवगत करावे व त्यांची संमती घ्यावी.

(अ. रा. नाईक)
अधीक्षक अभियंता

स्थळ प्रत का. सं. यांचे स्वाक्षरीत.

जा.क्र. परिपत्रक/न्यायप्र/विधीशुल्क/1183/2014/3804 दिनांक : 02-05-2018

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव.

1. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद
2. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद
3. मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक.

4. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद.
5. अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड.
6. अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ.
7. अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद.
8. अधीक्षक अभियंता, जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद.
9. अधीक्षक अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड.
10. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद.
11. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड.
12. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.
13. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर.

**सदर परिपत्रकाची प्रत मंडळस्तरावरून महामंडळातील सर्व कार्यकारी अभियंता यांना अनुपालनास्तव देण्यात यावी.**

14. कायदा सल्लागार, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
15. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
16. तांत्रीक शाखा- 1, 2, 3, 4, व 5, संगणक शाखा, लेखा शाखा 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8 व 9 यांना माहितीस्तव.